# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : **diplomadesk10dte@gmail.com** Internet : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : 10/एनजीपी/माहितीसंग्रह/ मा.अ./2016/ ३९६
दिनांक :

22 APR 2016

प्रति,
प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित,
अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड
केटरींग टेक्नॉलॉजी, पदविका तंत्रनिकेतन,
महाराष्ट्र राज्य.

विषय : संस्थेच्या मान्यतेच्या अनुषंगाने कागदपत्र/ माहिती उपलब्ध करुन देणेबाबत....

उपरोक्त विषयाबाबत राज्यातील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँडकेटरींग टेक्नॉलॉजी, पदविका तंत्रनिकेतनांच्या (व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या) संस्था प्रमुखांना सदर परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस भेट देण्याऱ्या विविध समित्यांना तपासणीकरिता/ माहिती अधिकार याकरीता काही आवश्यक प्रमाणपत्र/ कागदपत्र यांची आवश्यकता असते. राज्यातील व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांची संख्या विचारात घेता, सर्व संस्थांची कागदपत्रे अद्यायावत करणे व आवश्यकतेनुसार शोधून काढणे, जतन करणे कठीण होत आहे. तसेच संस्थांनाही अशा प्रकारच्या कागदपत्रांच्या प्रती वेळोवेळी सादर कराव्या लागतात, यामुळे स्टेशनरी व वेळ या दोन्हींचा अपव्यय होतो. करीता पर्यायी व्यवस्था म्हणून संस्थेच्या/ अभ्यासक्रमांच्या मान्यतेशी संबंधीत सर्व कागपत्रांच्या सॉफ्टकॉपी (स्कॅन कॉपी) संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याचे संचालनालयाच्या विचाराधीन आहे. सदर कार्यवाही करण्याकरीता सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांची एकवेळ माहिती (One Time Information) संकलित करणे आवश्यक असुन, यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

2. राज्यातील व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांनी खालील नमूद व संस्थेच्या/पदविका अभ्यासक्रमांच्या मान्यतेशी संबंधीत कागदपत्रे त्यांचे प्राचार्यांनी साक्षांकित करुन स्कॅन करतांना त्यासमोर नमूद केलेल्याप्रमाणे नाव द्यावे.

| अ.क्र. | कागदपत्राचा तपशिल | स्कॅन करतांना द्यावयाचे नाव |
|---|---|---|
| 1. | संस्थेचे नोंदणी पत्र | DTE Code_Trust Registration.pdf |
| 2. | पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या संचालनालयाचे प्रथम मान्यतेचे पत्र (अंतिम मान्यता) | DTE Code_First Approval of DTE.pdf |
| 3. | पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थेच्या प्रथम मान्यतेबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र. | DTE Code_AICTE Approval.pdf |
| 4. | पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थेच्या प्रथम मान्यतेबाबतचा शासन निर्णय | DTE Code_State Approval GR.pdf |
| 5. | वेळोवेळी सुरु करण्यात आलेल्या नवीन पदविका अभ्यासक्रमाच्या तसेच सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमते झालेल्या वाढ/घट, सेकंड शिफ्ट, संस्थेच्या नावात बदल, अभ्यासक्रमांच्या कालावधीत/ नावात बदल, इ. बाबत संचालनालयाचे मान्यतेचे पत्र (अंतिम | DTE Code_New Course/Increse in In[illegible]al |

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
27 APR 2016
आवक क्र......5834.........

\\DTENS1\desk10\DINESH\takrar forwording Letter 2015-16 New 25.2.2016.docx

| | | |
|---|---|---|
| | मान्यता) | |
| 6. | वेळोवेळी सुरु करण्यात आलेल्या नवीन पदविका अभ्यासक्रमाच्या तसेच सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमते झालेल्या वाढ/घट, अभ्यासक्रम बंद करणे, सेकंड शिफ्ट, संस्थेच्या नावात बदल, अभ्यासक्रमांच्या कालावधीत/ नावात बदल, इ. बाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र. | DTE Code_New Course/Increse in Intake/Closure of Course AICTE Approval. pdf |
| 7. | वेळोवेळी सुरु करण्यात आलेल्या नवीन पदविका अभ्यासक्रमाच्या तसेच सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमते झालेल्या वाढ/घट, अभ्यासक्रम बंद करणे, सेकंड शिफ्ट, संस्थेच्या नावात बदल, अभ्यासक्रमांच्या कालावधीत/ नावात बदल, इ. बाबत मान्यतेचे शासन निर्णय | DTE Code_New Course/Increse in Intake/Closure of Course GR. pdf |
| 8. | महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे आज पर्यंतचे संलग्नीकरण प्रमाणपत्र/ पत्र | DTE Code_MSBTE Affiliation Letter.pdf |
| 9 | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे आज पर्यंतचे मुदतवाढ पत्र (EOA) | DTE Code_AICTE Extension of Approval Letter.pdf |
| 10. | संस्था व संचालनालय यांच्या संयुक्त खात्यात पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याच्या अनुषंगाने ठेवण्यात आलेल्या मुदतठेव पावत्या. | DTE Code_FD Deposite Receipt.pdf |
| 11. | संस्थेच्या/ तंत्रनिकेतनांकरीता त्यांच्या नावावर उपलब्ध असलेली जमीनसंदर्भात कागदपत्र. | DTE Code_Land Document 7/12.pdf |
| 12. | भोगवटा प्रमाणपत्र | DTE Code_Occupancy Certificate.pdf |
| 13. | इमारती संदर्भात कागदपत्रे | DTE Code_Building Document.pdf |
| 14. | प्रयोगशाळा/ कार्यशाळा/ ग्रंथालय इ.च्या उपलब्धेबाबत कागदपत्रे | DTE Code_Laboratory Document.pdf<br>DTE Code_Workshop Document. pdf<br>DTE Code_Library Document.pdf. etc. |
| 15. | संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांची प्राचार्यांनी प्रमाणित केलेली यादी. | DTE Code_List of Employees with Joining date(dd/mm/yyyy) .pdf |
| 16. | संस्थेतील शिक्षकीय कर्मचाऱ्यांचे नियुक्त्यांना संचालनालय /महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत देण्यात आलेले मान्यता पत्रे | DTE Code_Staff Approval letter.pdf |
| 17. | संस्थेत सुरु असलेल्या सर्व अभ्यासक्रमांचे अभ्यासक्रम निहाय शिक्षण शुल्क बाबत कागदपत्र. | DTE Code_Shikshanshulk.pdf |
| 18. | संस्थेच्या/ अभ्यासक्रमांच्या मान्यतेच्या अनुषंगाने संचालनालय/ मंडळ/ अ.भा.तं.शि.प. यांना सादर केलेले हमीपत्र/ करारनामा/प्रतिज्ञापत्र. | DTE Code_Agreement.pdf<br>DTE Code_Affidavit.pdf<br>DTE Code_Hamipatra.pdf. |

वरील प्रमाणे कागदपत्रे एका संस्थेकरीता एक याप्रमाणे डिव्हीडी (DVD) याप्रमाणे स्कॅन करावीत. संस्थेकडे एखाद्या कागदपत्राचे एकापेक्षा जास्त संदर्भ असल्यास वर्ष निहाय स्कॅन फाईलच्या नावानंतर "'--1", "'--2" अशाप्रकारे नाव देण्यात यावे.

3. सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती व सॉफ्टकॉपी संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे गुणवत्तायादी तपासणचे वेळापत्रकानुसार सादर कराव्यात.
4. साक्षांकीत प्रती सादर केल्यानंतर कागदपत्रांमध्ये बदल करता येणार नाही. तथापि, नंतर प्राप्त होणारी कागदपत्र सादर /"Add" करता येतील.

5. सर्व कागदपत्रे संस्था, तपासणी समिती, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, संचालनालय, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासन यांना आवश्यकतेनुसार उपलब्ध असतील.
6. सर्व कागपपत्रे A4 आकाराची असावीत, किंवा त्या आकारात स्कॅन करण्यात यावीत.
7. वरील सर्व माहिती 03 प्रतीत DVD (Read/Write) मध्ये संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कायार्लयात सादर कराव्यात. त्यापैकी एक DVD ही संबंधीत विभागीय कार्यालयाकरीता व दुसरी DVD या संचालनालयाकरीता असेल. तसेच सदर माहितीची एक अतिरिक्त प्रत संस्थेने स्वतःकडे जपून ठेवावी.

वरील सर्व कागदपत्रे व माहिती आपल्या स्तरावर तयार ठेवून, संबंधीत विभागीय कार्यालयामार्फत संस्थानिहाय गुणवत्ता यादी तपासणीच्या वेळापत्रकानुसार विभागीय कार्यालयात सादर करण्यात यावी. सदर माहिती अत्यंत महत्वाची असल्योन अचुक असेल याची सर्व संस्थाप्रमुखांनी दक्षता घ्यावी व उपरोक्त सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त बाबत आपल्या अखत्यारीतील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँडकेटरींग टेक्नॉलॉजी, पदविका तंत्रनिकेतनांच्या (व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या) संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व सर्व संस्थांची माहिती संबंधीत संस्थेच्या गुणवत्तायादी तपासणीच्यावेळी संकलित करण्यात यावी, याबाबत पुढील निर्देश स्वतंत्रपणे देण्यात येतील.